**कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या सन २०१६-१७ चे लेखे विधान मंडळाच्या सदनात पटलावर ठेवण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे:-**

**प्रस्तावना:-**

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची कंपनी कायदा, १९५६ अन्वये दिनांक १४.०३.१९८५ रोजी राज्य शासनाकडून स्थापना करण्यात आली. मात्र हे महामंडळ सतत तोट्यात चालत असल्यामुळे कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ बंद करण्याची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक उपक्रम पुर्नरचना मंडळाने केली होती.

शासनाने दि.०९.११.२००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळासह काही महामंडळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

तदनंतर महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुर्नरचना मंडळाने केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे मर्यादित, कोल्हापूर, यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती योजना शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर २००७ अन्वये लागू करण्यात आली. कोल्हापूर चित्रनगरी बंद करण्यास मराठी चित्रपट सृष्टीचा व स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेऊन शासन निर्णय दि. १० मार्च, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये हे महामंडळ बंद न करता त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला.

**विलंबाची कारणे :-**

**१)** सन, १९९९ पासून महामंडळ दुरावस्थेत असल्यामुळे आणि नियमित अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यरत नसल्यामुळे महामंडळाची अवस्था अत्यंत बिकट झाली.

**२)** कार्यालयाची इमारत (पाटीलवाडा), स्टुडिओची इमारत येथे खूप प्रमाणात वाळवी लागून महामंडळाचा बहुतांशी अभिलेख खराब झालेला होता.

**३)** त्यामुळे लेखा परिक्षणाकरीता लेखाविषयक अभिलेख उपलब्ध नसल्याने बँक विवरणपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु बँकेकडून इतका जूना अभिलेख उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दाखविण्यात आली.

४) तत्कालिन स्थितीत महामंडळाकडे लेखापरीक्षणाकरीता आवश्यक असलेले अभिलेख उदा. रोख नोंदवही, खर्चाची प्रमाणके, देयके इत्यादी उपलब्ध नव्हती ही वस्तुस्थिती आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात आले आहे.

५) शासन निर्णय दि. १० मार्च, २००८ अन्वये महामंडळ पुनर्जिवित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कोल्हापूर चित्रनगरी पुनर्जिवित्त झाल्यानंतर त्यांचे सर्व व्यवहार गोरेगाव चित्रनगरी येथून करण्याचे आदेश देण्यात आले. कोल्हापूर चित्रनगरीचे सर्व दप्तर गोरेगाव येथे होते. तथापि, गोरेगाव चित्रनगरी कार्यालयास आग लागल्यामुळे अभिलेखे नष्ट झाले. ही बाब महालेखाकार कार्यालयास कळविण्यात आली होती. या अनुषंगाने सन २००४-०५ ते २००८-०९ चे दप्तर उपलब्ध न झाल्यामुळे लेखे पूर्ण करता आले नाहीत. याबाबत महालेखाकार कार्यालय, सनदी लेखापाल व व्यवस्थापकीय संचालक यांच्या चर्चेअंती सदरचे लेखे दप्तर उपलब्ध झाल्यानंतर तयार करावे असे ठरले.

६) शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर, २००७ अन्वये सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीत महामंडळातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा स्वेच्छानिवृत्तीने समाप्त करण्यात आल्या. त्यामुळे महामंडळाचे आर्थिक व्यवहार बंद झाले. महामंडळ कार्यरत नसल्यामुळे सदर कालावधीतील दप्तर वाळवीमुळे खराब झाले. सदर बाब महालेखाकार कार्यालयास दि.२६-०९-२०१९ व दि.०४-०१-२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली होती.

७) सन २००४-०५ ते २०११-१२ चे लेखे तयार करण्यासाठी अंतर्गत हिशेब तपासणीस श्री. प्रदीप दोषी यांची दि.०७-०७-२०१२ पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली. श्री. दोषी यांनी सन २००९-१० ते २०११-१२ चे लेखे तयार करुन जानेवारी, २०१५ मध्ये महामंडळास उपलब्ध करुन दिले व सदरचे लेखे दि.०५ जानेवारी, २०१५ रोजी संचालक मंडळाने मान्यता दिल्यानुसार (संचालक मंडळाचा ठराव क्र. ३बी, ३सी, व ३डी) महालेखाकार कार्यालयाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल श्री. प्रदिप वडेर यांना पुढील लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात आले.

८) सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीच्या लेख्यांना तत्कालिन सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री. विनोदजी तावडे साहेब यांची माहे दि.१३-०२-२०१९ रोजी मान्यता मिळूनही पुनःश्च परिक्षणामुळे ही सर्व प्रक्रिया नव्याने पार पाडावी लागली आहे. ही बाब ध्यानात घेणे आवश्यक आहे.

९) सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखे महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आले होते. सदर लेख्यांवर महालेखाकार कार्यालयाने पत्र क्र. LAP-TNC/AMG-IV/३६

दि.२७-११-२०२० च्या पत्रान्वये आर्थिक वर्ष सन २००४-०५ ते २००८-०९ या लेख्यांवर आक्षेप नोंदवले. परंतु कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादूर्भावामुळे सर्व यंत्रणा ठप्प झाली. त्यामुळे लावण्यात आलेल्या निर्बंधामुळे कामकाजावर परीणाम झाला. परीणामी त्या आक्षेपांचे स्पष्टीकरण महालेखाकार कार्यालयास दि. ०९-०६-२०२२, दि.११-०८-२०२२, व दि.२१-०८-२०२३ रोजी कळविण्यात आले.

**१०)** सादर केलेल्या स्पष्टीकरणासंदर्भात महालेखाकार कार्यालयाने चर्चेअंती सन २०१०-११ ते २०११-१२ या आर्थिक वर्षात लेख्यांची दुरुस्ती करुन फेर सादर करण्यास सांगितले.

**११)** सदर बदलण्यात आलेले लेखे पुन्हा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत नेमण्यात आलेले श्री. प्रदिप वडेर यांना कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयाचे पत्र क्रमांक कोचिन/३९९/२०२२ दि.१६-०९-२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार श्री. प्रदिप वडेर यांनी या लेख्यांमध्ये दुरुस्ती करुन कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या कार्यालयामध्ये सादर केले.

**१२)** महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या दि.०८-०५-२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयाच्या दि.०७-११-२०२३ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली.

**१३)** महालेखाकार कार्यालय प्रतिष्ठा भवन मुंबई यांचे दि.१५-१२-२०२३ रोजीच्या पत्रान्वये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखा परीक्षणाकरिता वरिष्ठ लेखापरिक्षक व त्यांचे सहा अधिकाऱ्यांचे पथक गोरेगाव चित्रनगरी येथील कार्यालयात परीक्षणासाठी आले होते. दि.१८-१२-२०२३ ते दि.०५-०१-२०२४ या कालावधीत कोल्हापूर चित्रनगरीचे सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षण करण्यात आले असून, सदर लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांचे पत्र क्र. प्रमले/लेप-I/पीएसयु/केसीएमएल/२००४-०५ से २०११-१२/१०२ दि. २६-४-२०२४ च्या पत्रान्वये सुचविण्यात आलेल्या त्रुटीची सुधारणा पुढील वर्षांच्या लेख्यांमध्ये करण्याबाबत सुचविले. सदर लेखा परिक्षणा दरम्यान महालेखाकार कार्यालयाच्या उप महालेखापरीक्षक यांनी दि.२८-१२-२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देवून कोल्हापूर चित्रनगरीच्या सुरु असलेल्या लेखापरीक्षणाचा आढावा घेतला होता, ही विशेषत्वाने नमूद करण्याची बाब आहे.

**१४)** सन २०१२-१३ ते २०१५-१६ या लेख्यांच्या संदर्भात काढलेल्या आक्षेपांची पूर्तता कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयांचे पत्र क्र. कोचिन-२०२४/२७५ दि. १५-०२-२०२४ च्या पत्रानव्ये करण्यात आली. या सादर करण्यात आलेल्या आक्षेपांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने सदर लेखे ३ प्रतीत संचालक मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मांडून त्याची मान्यता झाल्यानंतर

महालेखाकार कार्यालयास अहवाल सादर करावे असे महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. प्रमले/लेप-१/पीएसयु/केसीएमएल/२०१२-१३ से २०१५-१६/९९, दि.२५-०४-२०२४ तसेच पत्र क्र. प्रमले/लेप-१/पीएसयु/केसीएमएल/२०१२-१३ से २०१५-१६/१०२ दिनांक २६-०४-२०२४ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आले आहे.

**१५)** वरील सर्व मुद्देनिहाय परीस्थिती पाहता कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे वार्षिक लेखे विधान मंडळाच्या सदनात पटलावर ठेवण्यास विलंब झाल्याचे दिसून येते.

**१६)** मात्र कागदपत्रांची अनुपलब्धता, जागेची कमतरता, कुशल मनुष्यबळाची उणिव तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्याकडून वारंवार उपस्थित केलेले मुद्दे यामुळे या प्रक्रियेस विलंब झालेला दिसून येतो. मात्र हा विलंब हेतूपुरस्सर अथवा पूर्वनियोजित नसून तो कालौघात घडला असल्याचे वरील सर्व मुद्द्यांचे अवलोकन करता दिसून येते.

**१७)** सन २०१२-१३ से २०१५-१६ या कालावधीतील लेखे सन जुलै, २०२४ मध्ये विधानमंडळ व विधानपरीषद पटलावर ठेवण्यात आले असून त्यास मान्यता मिळालेली आहे.

**१८)** २०२४-२५ या वर्षात विधान सभेची निवडणूक जाहीर झाल्याने व माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत आचार संहिता लागू असल्याने संचालक मंडळाची बैठक आयोजित होऊ शकली नाही. या कारणास्तव सन २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीचे लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवता आले नाही.

**१९)** सन २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीचे लेखे दि. १७-०३-२०२५ या अर्थसंकल्पिय अधिवेशनातमध्ये मा. ॲड, आशिष मिनल बाबाजी शेलार, मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, तथा अध्यक्ष, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ याच्या अध्यक्षतेखाली हे लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले.

**२०)** महालेखाकार, मुंबई सन २०१६-१७ या वर्षाच्या लेख्यांना समीक्षा प्रमाणपत्र NRC दिलेले व त्या संचालक मंडळाने स्विकृत केलेले लेखे आता सभागृहासमोर सादर करण्यात येत आहेत.

.....